**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स आयान मल्टीट्रेड एल.एल.पी.(युनिट नं.१) समशेरपुर, तालुका व जिल्हा – नंदुरबार, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित साखर कारखाना गाळप क्षमता विस्तारिकरण ४,९००.० ते १०,०००.० मे. टन प्रतिदिन, सहवीज निर्मिती प्रकल्प विस्तारिकरण १४.० ते ३२.० मेगा वॅट आणि नविन प्रस्तावित मोलॅसिसवर आधारित १००.० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा आसवणी प्रकल्प उभारणेबाबत एकत्रित पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स आयान मल्टीट्रेड एल.एल.पी. (युनिट नं.१) समशेरपुर, तालुका व जिल्हा – नंदुरबार, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित साखर कारखाना गाळप क्षमता विस्तारिकरण ४,९००.० ते १०,०००.० मे. टन प्रतिदिन, सहवीज निर्मिती प्रकल्प विस्तारिकरण १४.० ते ३२.० मे. वॅट आणि नविन प्रस्तावित मोलॅसिसवर आधारित १००.० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा आसवणी प्रकल्प उभारणेबाबत एकत्रित पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक ०२ नोव्हेंबर २०२० रोजी सकाळी ११. ००वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. ई. ६१/२०२० व्दारा पत्र क्र. बीओ-जेडी/डब्लूपीसी/ पीच/बी- २०१०२३ एफटीएस-००९९, दि २३/१०/२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली :-

१) जिल्हादंडाधिकारी, नंदुरबार किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी - धुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे. - **समन्वयक**

सौ. सौजन्या पाटील, उप प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, धुळे तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे , सदस्यांचे व प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षाच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय नवी दिल्ली यांच्या दि. १४ सप्टेंबर २००६ व सुधारीत दि. १ डिसेंबर २००९ च्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सौ. पाटील यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स आयान मल्टीट्रेड एल.एल.पी. (युनिट नं.१) समशेरपुर, तालुका व जिल्हा – नंदुरबार, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित साखर कारखाना गाळप क्षमता विस्तारिकरण ४,९००.० ते १०,०००.० मे. टन प्रतिदिन, सहवीज निर्मिती प्रकल्प विस्तारिकरण १४.० ते ३२.० मे.वॅट आणि नविन प्रस्तावित मोलॅसिसवर आधारित १००.० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा आसवणी प्रकल्प उभारणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगीक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प मुख्य पर्यावरण अधिसूचना २००६ व तदनंतरची जून २०१९ ची सुधारित अधिसूचना अन्वये संवर्ग " ब " मध्ये मोडत असल्याने, तसेच सदर प्रकल्पापासून ५ किलोमीटरच्या परिघामध्ये महाराष्ट्र व गुजरात अंतरराज्य सीमा येत असल्याने सदर प्रकल्प हा केंद्रीय समितीकडे अधिगृहित होतो, म्हणून सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणींय बदल मंत्रालय नवी दिल्ली यांची पर्यावरण अनुमती प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयास प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन आसावनी अर्ज दिनांक ०६/०५/२०२०, कारखाना विस्तारी प्रकल्प दि. १३/०८/२०२० रोजी सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी आसावनी प्रकल्प दिनांक २८/०६/२०२० व कारखाना विस्तारीकरण प्रकल्प दि. २१/०८/२०२० रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे, त्या अनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय म.प्र.नि. मंडळ, धुळे, यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०१ ऑक्टोबर २०२० रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सुचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्या प्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्याकंन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत शासनाच्या अधिसुचीत कार्यालयामध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, विभागीय कार्यालय, पश्चिम मध्यम विभाग, न्यू सेक्रेटरिएट बिल्डींग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर – ४४०२०१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नंदुरबार, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नंदुरबार, जि. नंदुरबार, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार, तहसील कार्यालय नंदुरबार जिल्हा नंदुरबार, ग्रामपंचायत कार्यालय समशेरपूर, शिंदे, कोरीट, बामडोद, ता. जि. नंदुरबार. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक,

उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

समन्वयक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप- प्रादेशिक कार्यालय धुळे, येथे एक आक्षेप प्राप्त झाला आहे. तो इंदिरा महिला सहकारी बँक लि. नंदुरबार चा असुन सदर बँकेचा आक्षेप हा पर्यावरण विषयक नसले बाबतची माहिती उपस्थितांना देण्यात आली. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सुचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरूपात ती देऊ शकतात असे सांगितले.

समन्वयक सौ. पाटील यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित दोन्ही प्रकल्पांविषयीची सविस्तर माहिती, उत्पादन पद्धती, पर्यावरण आघात मुल्यांकन व पर्यावरण व्यवस्थापन योजनांनबाबत सादरीकरण केले.

सादरीकरणानंतर समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**खालील उपस्थितांनी चर्चेत भाग घेतला व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे:-**

| अ. क्र. | उपस्थितांचे नाव व उपस्थित केलेले विचार/ टिका टिपणी, आक्षेप. | प्रकल्प प्रस्तावकाकडून / प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांच्याकडून करण्यात आलेला खुलासा |
|---|---|---|
| १ | **श्री मधुकर चौधरी, राहणार-समशेरपूर, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-**<br>प्रकल्पातील उत्पादनामुळे उत्पन्न होणारे सांडपाणी व हवा प्रदूषण याबाबत देखभाल नियमाप्रमाणे करण्यात येते काय? | **पर्यावरण सल्लागार —**<br>ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टिम साखर कारखान्यातील बॉयलरला बसविण्यात आलेली आहे व तशीच ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टिम आसवणी इंसीनरेशन बॉयलर ला बसवण्यात येणार आहे व सीपीयू प्रकारची औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याचा सविस्तर अहवाल शासनास सादर करावा लागतो. दर तीन महिन्यांनी आम्ही आमचे स्वतःमार्फत (सेल्फ मॉनिटरिंग) करत असतो. त्याच प्रमाणे स्थानिक मप्रनि मंडळाचे अधिकारी प्रत्येक महिन्यात कालावधीप्रमाणे प्रकल्पास पहाणी करण्यास येऊन पाण्याचे नमुने गोळा करत असतात. ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टिम मुळे २४ तास प्रत्येक क्षणाची देखभाल करण्यात येत असते. |

| | | |
|---|---|---|
| २ | **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती -**<br>यांनी उपस्थितांना सूचना केली. सदरहू प्रकल्पाच्या अनुषंगाने पर्यावरण विषयक काही सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. आपणास या प्रकल्पामुळे काही धोका वाटत असेल किंवा पुर्वानुभव असेल तर त्याबाबत मुददे उपस्थित करावे.<br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार ह्यांनाही आपली कार्यपध्दती सांगण्याची सूचना केली. त्यावेळी सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी एकत्रपणे उत्तर देण्याची सूचना केली. | -- |
| ३ | **<u>श्री गिरीधर शंकर पाटील, राहणार – शिंदे, उपसरपंच, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-</u>**<br>कारखान्यामुळे पंचक्रोशीतील शेतक-यांना फारच त्रास झाला. ब-याच प्रमाणात काजळी तयार होत होती व ती शेतातील हरभरा, कापूस, पपई या पिकांवर पडत होती. काजळीमुळे हरभरे काळे व्हायचे. कापूस काळा व्हायचा. त्यामुळे पीक निघाले तरी पिकाची घट व्हायची. उत्पादन झाल्यावरही मळनी केल्यावर हरभरे काळे व्हायचे. त्यामुळे साहजिकच व्यापारी कमी भाव द्यायचे. अशा अनेक अडचणी काजळीमुळे या परिसरातील शेतक-यांना भोगाव्या लागल्या. वारा अगोदर पूर्वेकडे वाहतो व नंतर पश्चिमेकडे वाहतो. त्यावेळीही आम्ही आमचे प्रश्न मांडत होतो. मात्र ज्या प्रमाणात शेतक-यांचे नुकसान झाले, त्याप्रमाणात आमहांला प्रतिसाद (रिस्पॉन्स) मिळाला नाही. तरी कारखान्याकडून नुकसान होणार नाही हे पहावे. येथे पाऊस कमी असतो. शेती ही कोरडवाहू आहे. त्यामुळे या चार महिन्यात जे पीक येते, त्यावरच आम्ही अवलंबून असतो. काजळीच्या प्रदूषणामुळे ते पीक कमी येणार, पीकाला काजळीमुळे भाव कमी मिळणार असे चालू राहते. तरी कारखान्याने याची नोंद घ्यावी व भविष्यात काही शेतक-यांना त्रास होऊ नये याचा विचार करावा व परिसरातील / पंचक्रोशीतील सर्व ग्रामपंचायतीस त्याबाबत कारखान्याने लेखी आश्वासन द्यावे. तसेच तक्रार केल्यावर त्याबाबत त्वरित कार्यवाही व्हायला पाहिजे. | **पर्यावरण सल्लागार –**<br>पूर्वी साखर कारखान्यामध्ये ३२ टनाचे जुने बॉयलर होते. त्यास वेट स्क्रबर नावाची सयंत्रणा व ५० मीटर उंचीची चिमणी होती. आता नविन १६० टीपीएच चा बॉयलर हा कार्यान्वित असून, त्यास रु. ६.५० कोटीची ईएसपी (इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपिटेटर) ही अत्याधुनिक सयंत्रणा लावली आहे, जी ९९.५% कार्यक्षमता दाखविते. व त्याच्या चिमणीची उंची ही ८२ मीटर्स आहे. तर प्रत्येक हंगामात सदर यंत्रणेचा अभ्यास करून आम्हांला दर सहा महिन्यांनी देखभाल करावीच लागते. पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की प्रत्येक हंगामात आम्ही स्वतः येउ व जरुरी असलेले मॉनिटरिंग करुन अभ्यासाअंती अहवाल सादर करु. त्यांनी हमी दिली की भविष्यात आपणास काजळीचा त्रास होणार नाही. कारण त्याच्या चिमणीची उंची ही ८२ मीटर्स आहे.<br>आपल्या सूचनेची नोंद घेण्यात आलेली असून भविष्यात आपण शेजारील गावांची एक समिती स्थापन करून याबाबत वेळोवेळी असा कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी घेऊ. |

| | | |
|---|---|---|
| ४ | **श्री. चंद्रकांत चौधरी, समशेरपूर, तालुका व जिल्हा - नंदुरबार:-**<br>आपण सुंदर सादरीकरण केलेले आहे. पण शेवटी आपले ध्येय काय आहे? एवढे तुम्ही मोठे ध्येय ठेवलेले आहे तर गावाचा काय विचार केलेला आहे?<br>आमचा काय फायदा होईल? हा कारखाना चालू होऊन किती वर्षे झाली? गावाचा काहीही विकास झालेला नाही. | **पर्यावरण सल्लागार-**<br>साखर कारखान्याची गाळप क्षमता ४,९०० मे. टन ते १०,००० मे.टन प्रतिदिन क्षमता वाढवत आहोत. त्यामुळे परिसरातील सर्वांचा जास्तीतजास्त ऊस कारखान्यात गाळपासाठी येईल. परिसरातील शेतक-यांचा ऊस वाया जाणार नाही. त्यांना चांगला भाव देता येईल. आसवणी १०० KLPD ची घेत आहोत. आसवणी उद्योगामुळे उप पदार्थ तयार होतील. त्यामुळे कारखाना हा आर्थिक दृष्टया स्थैर्य प्राप्त करेल.<br>पर्यावरण सल्लागार यांनी मी सर्वेक्षण करताना फिरलो, त्यावेळी गावात फक्त रस्त्याचाच प्रश्न नाही, तर पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न आहे, शौचालयाचा प्रश्न आहे. शिवाय विजेचाही प्रश्न आहे. हे प्रश्न आपणास सोडविता येतील.<br>व्यवस्थापनाच्या वतीने आपण एक समिति तयार करु. व्यवस्थापनाचा एक प्रतिनिधी, ग्रामपंचायतीचा एक सदस्य असेल, गावातील प्रतिनिधी याची समिती करुन दर दोन महिन्यांनी बैठक घेऊ.<br>**प्रकल्प प्रवर्तकांचे संचालक —**<br>श्री चौधरी यांचा प्रश्न समजून घेतलेला आहे. आपली पर्यावरणविषयक तक्रार नाही, तर आपली तक्रार ही सीएसआर बाबत आहे. सीएसआर म्हणजे कारखान्यास उत्पन्नावर जो फायदा होतो, त्याच्या २% आपण आपल्या पंचक्रोशीत वापरला पाहिजे. आता सर्वांनाच माहित आहे की कारखानदारी ही आता कुठल्या परिस्थितीतून जात आहे. काही वर्षे आपणास उत्पन्न होत नव्हते. तरी आपण आता प्रकल्पाचे विस्तारिकरण करु या, कमीतकमी खर्चात जास्तीतजास्त उत्पादन घेऊ. वीज निर्मिती करुया वीजनिर्मितीत आपणास जे उत्पन्न् मिळेल, मोलॅसिसमधून अल्कोहोल मिळेल, त्यातून फायदा घेऊ, तरच कंपनी सीएसआर वर खर्च करु शकेल. आतापर्यंत आपण शेतक-यांना एक रकमी एफआरपी दिलेला आहे. जे पश्चिम महाराष्ट्रातील कारखान्यांना जे जमले नाही, ते या कारखान्याने केलेले आहे. ते कौतुकास्पदच आहे. ज्यावेळी आपणास फायदा होईल, त्यावेळी सीएसआरबाबत जे शासनाने निष्कर्ष दिलेले |

| | | |
|---|---|---|
| | | आहेत, ते पाळण्यात येतील. आम्ही त्याप्रमाणे निश्चित सीएसआर बाबत निर्णय घेऊ. त्यावेळी उपस्थितांनी टाळ्या वाजवून स्वागत केले.<br>**पर्यावरण सल्लागार –**<br>आमची सीएसआर योजना तयार असून त्याची पद्धतशीर अंमलबजावणी होईल व कोणीही नाराज होणार नाही त्याची आम्ही काळजी घेऊ. |
| ५ | **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>यांनी सूचना केली की पर्यावरणविषयक प्रश्न विचारण्यात यावे. | -- |
| ६ | **<u>श्री उमेश गोपाळ पाटील, कोरीट गाव, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-</u>**<br>सीएसआर निधी काहीप्रमाणात रस्ता दुरुस्ती वापरल्यास ठीक होईल. कारण शेतकरी ऊस देण्यास येतो त्यावेळी त्यास रस्ता चांगला नसल्याने खूपच त्रास सहन करावा लागतो. दुसरी गोष्ट या पंचक्रोशीत खूप चांगली गोष्ट होत आहे. प्रकल्पाचे विस्तारिकरण होत आहे. मात्र येथून पुढे म्हणजे शिंदा, समशेरपुर, शहादा येथे पाणी नाही. लिफ्ट इरिगेशन तयार आहे. जर सीएसआर निधी तिकडे वळविला तर सर्वांचाच फायदा होईल.<br>विस्तारिकरणाचा फायदा म्हणजे रोजगार निर्मिती होईल, त्यावेळी स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. | **प्रकल्प प्रवर्तकांचे संचालक-**<br>आपला प्रश्न सीएसआरबाबत होता. आम्ही त्याची निश्चितच दखल घेऊ. रस्ते चांगले असतील तर वाहतुकदारास ते सोयीचे आहे. सीएसआर बरोबरच इतर माध्यमातून करता येईल.<br>त्यांनी सांगितले आता कार्यरत कर्मचा-यांमध्ये ९५% कर्मचारी हे स्थानिक आहेत. तो १००% कसा होईल त्यासाठी आपण विस्तारिकरणात वाटचाल करु. |
| ७ | **<u>श्री. शिवदास नथू पवार, वसूली अधिकारी, इंदिरा बँक:-</u>**<br>आमचा विषय हा पर्यावरणासंबंधी जरी नसला तरी पर्यावरणाअंतर्गत जो प्रकल्प होऊ घालतो आहे, त्यातील क्षेत्र आहे. त्या क्षेत्रात सर्व्हे नं १०२, १०३,१०४ ही जे येतात, ती अद्यापही कंपनीच्या नावावर नाहीत. तरी या सर्व्हे नंबरवर आपण ना हरकत दाखला देऊ नये अशी आमची आपणास विनंती आहे. | **प्रकल्प प्रवर्तकांचे संचालक –**<br>आता जो प्रकल्प येत आहे, या सर्व्हे नंबरबाबत जे बोझे आहे, ती बाब न्यायप्रविष्ठ आहे. पण त्यामधील जे बोझे आहेत, सर्व्हे नं. १०२/२, १०३ व १०४/२ यावर आपण काहीही बांधकाम वा कुठलेही सयंत्रे बसवलेली नाहीत. न्यायप्रविष्ठ गटावर कुठलेही कामकाज नाही. |
| ८ | **<u>श्री. सुरेश पाटील, बामडोद गाव, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-</u>**<br>यांनी वाहतुकीबाबत आक्षेप नोंदविताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांची वाहतुक ही चुकीची आहे. लोकांना खूपच त्रास होतो. एक ट्रॅक्टरला दोन-तीन गाडे लाऊन ऊस वाहून आणतात. त्यामुळे माझ्या डोळ्यासमोर दोन-तीन अपघात झालेले आहेत. तरी वाहतुकीवर आपण नियंत्रण ठेवावे. | **प्रकल्प प्रवर्तकांचे संचालक -**<br>आता दोन दोन गाडीचे परवानगी बंद करुन एकच गाडीची परवानगी देणार आहोत. प्रत्येक गाडीला आरटीओच्या नियमाप्रमाणे रिफ्लेक्टर लावण्यात येतील. त्यामुळे भविष्यात ही गोष्ट होणार नाही याची आम्ही खात्री देतो. |

| | | |
|---|---|---|
| ९ | **<u>श्री. नरोत्तम पाटील, समशेरपुर, तालुका व जिल्हा-नंदुरबारः-</u>**<br>बैलगाडीतून ऊसाची वाहतुक केली जाते. त्यामुळे सायंकाळी ४ ते ६ पर्यंत हवेत एवढे धुलीकण उडतात की लोकांना त्याचा भरपूर त्रास होतो. बैलगाडीत जास्त ऊस भरतात व फरफटत नेत असतात. याबाबत कायमचा पायबंद बसावा. त्याचप्रमाणे १० कि.मी. परिघातील शिवार रस्ते जर कारखान्याने करुन दिले तर ती आनंदाची बाब होईल. | **प्रकल्प प्रवर्तकांचे संचालक –**<br>आता नविन बैलगाड्या बनविल्या असून बैलगाडीची उंची वाढविली आहे. त्यामुळे ऊस आता फरफरटत येणार नाही. या आधिच सांगितल्याप्रमाणे रस्त्याच्याबाबत सीएसआर फंडातून जे योग्य होईल त्यावर पुढची कार्यवाही करु.<br>**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>जो वाहतुकीचा प्रश्न आहे, त्यात नियमितपणा आणा. कारखान्याच्या आवारात जर पार्किंग टर्मनिल करता येत असेल तर ते करा. आता धुळीबाबत आक्षेप नोंदविण्यात आला. तर पाण्याचा फवारा मारावा अशा पध्दतीच्या उपाययोजना कराव्यात.<br>**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>यांनी येथे सीएसआर बाबत सूचना सांगितली की आपण तेथे आवश्यक असणारी गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे प्राधान्य देण्यात यावे. असे केल्यास लोकांना ज्याची गरज आहे, ती पूर्ण होईल. |
| १० | **<u>श्री विजय शंकर पिंपळे, समशेरपुर, तालुका व जिल्हा-नंदुरबार, सदस्य, -</u>**<br>उत्पादन प्रक्रियेत मोलॅसिस व्यतिरिक्त कोणता कच्चा माल वापरला जाईल याची माहिती द्यावी. | **प्रकल्प प्रवर्तक –**<br>मोलॅसिस व्यतिरिक्त धान्ये- मका वापरता येतो. मात्र आम्ही ते काहीही करणार नसून फक्त मोलॅसिस वापरणार आहोत. |
| ११ | **<u>श्री नरोत्तम पटेल, समशेरपुर, तालुका व जिल्हा-नंदुरबार, सदस्य, -</u>**<br>कारखान्याच्या ईशान्य बाजूच्या शेतक-यांची तक्रार आहे की त्यांच्या ट्युबवेलला/विहिरींना खराब पाणी येत आहे. त्यामुळे पिकांची उत्पादन क्षमता कमी झालेली आहे. तरी याबाबत आपण काय केले व पुढे काय करणार याची माहिती द्यावी.<br>त्याच प्रमाणे तेथे जे सिध्देश्वर सिंचन प्रकल्प चालू आहे, त्यास जर थोडाफार हातभार लावला, तर हा परिसर सुजलाम, सुफलाम होईल व आपल्या १०,००० मे. टन गाळप प्रकल्पात आमचाही सहभाग होईल. | **प्रकल्प सल्लागार –**<br>काही वेळेस ट्युबवेल/विहिरींन शेजारी टॉयलेट, जनावरांचे गोठे, खताचे खड्डे, शोषखड्डे व सांडपाण्याचे गटर असतील तर जमिनीत मुरणे व झिरपण्याच्या प्रक्रियेमुळे भूगर्भातील पाणी दुषित होते. प्रकल्पा भोवतीच्या १० किमी त्रिज्येच्या अभ्यास क्षेत्रातील ट्युबवेल/विहिरींचे आम्ही केलेल्या सर्वेक्षण व तपसणीमध्ये काही ठिकाणचे पाणी दुषित झालेचे निदर्शनास आलेले आहे. आपणास भूगर्भातील पाणी खराब आहे, हे सांगितलेले आहे. तथापि ते कारखान्यामुळे आहे असे सिद्ध होत नाही. तरीही भविष्यात आपण सांगाल तेथील पाण्याचे नमुने गोळा करण्यात येतील व अभ्यास करून आपणास कळविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १२ | **श्री. चंद्रकांत चौधरी, समशेरपूर, तालुका व जिल्हा- नंदुरबार –**<br>प्रकल्पातील सांडपाणी जाऊन ज्यांचे जे नुकसान होते, त्यांनी काय करावे? | **पर्यावरण सल्लागार –**<br>साखर कारखान्यामध्ये सध्या अद्यावत सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविण्यात आली आहे. तसेच प्रस्तावित आसवणी प्रकल्पात स्पेंटवॉश इंसीनरेशन बॉयलर मध्ये जाळून नष्ट होणार असल्यामुळे सांडपाण्याबाबत प्रश्न निर्माण होणार नाहीत. |
| १३ | **श्री नरोत्तम पटेल, समशेरपुर, तालुका व जिल्हा- नंदुरबार, सदस्य, -**<br>यांनी आक्षेप नोंदविला की आम्ही वारंवार तक्रार केली, पण आमच्या तक्रारीची दखल घेण्यात येत नाही. | **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति तथा प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक –**<br>यांनी पर्यावरण सल्लागार व समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सूचना केली की बैठकीत नोंदविलेल्या आक्षेपांची दखल घेण्यात यावी.<br>**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती -**<br>यांनी मत मांडले की येथे जे आक्षेप नोंदविण्यात आले, ते कारखान्यामुळे असू शकतात किंवा इतर काहीही कारण असू शकते, येथे शेतक-यांचा प्रश्न आहे. त्यावर आपण काय उपाय योजना करून शकतो हे महत्वाचे आहे.<br>याबाबत वर सांगितल्या प्रमाणे एक सेल स्थापन करून त्यामार्फत वेळोवेळी सुचना लक्षात घेउन त्या सोडवण्याबाबतची दखल घेण्यात यावी. |
| १४ | **श्री. बन्सीलाल बाबूलाल कोळी, राहणार-कोरीट गाव, तालुका व जिल्हा-नंदुरबार, -**<br>विस्तारिकरण प्रकल्पात कोणकोणती हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येतील? | **पर्यावरण सल्लागार –**<br>विस्तारिकरण दोन प्रकारचे आहे. साखर कारखाना प्रकल्पाच्या बॉयलरला सध्या ईएसपी सयंत्रणा असून चिमणीची उंची ८२ मीटर आहे. व आसवणी प्रकल्पातील बॉयलरला ईएसपी सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार असून, चिमणी ची उंची ७२ मीटर असणार आहे. |
| १५ | **श्री. भगा शेगजी भिल, राहणार-शिंदे गाव, तालुका व जिल्हा-नंदुरबार, -**<br>आसवणी प्रकल्प किती दिवस कार्यान्वित राहिल? | **पर्यावरण सल्लागार –**<br>आसवणी प्रकल्प हा ३३० दिवस कार्यान्वित राहणार आहे. |
| १६ | **श्री. नरोत्तम पिंपळे, राहणार-समशेरपुर, तालुका व जिल्हा- नंदुरबार, -**<br>आसवणी प्रकल्पासाठी दररोज किती पाणी लागेल? | **पर्यावरण सल्लागार –**<br>२ लाख लिटर्स पाणी लागेल. यातील ८०% पाणी हे पुनर्वापरातून उपलब्ध होईल व फक्त २०% ताजे पाणी लागेल. |

| | | |
|---|---|---|
| १७ | **<u>श्री. नगिन चौधरी, राहणार- समशेरपुर, तालुका व जिल्हा- नंदुरबार, -</u>**<br>आसवणी प्रकल्पामुळे लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम होईल का? | **पर्यावरण सल्लागार –**<br>प्रकल्पामुळे कोणताही घातक परिणाम होणार नाही, दर सहा महिन्यांनी आरोग्यची देखभाल करण्यात येईल.<br>**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>आरोग्य शिबिर दर सहा महिन्यांनी घेण्यात यावे. |
| १८ | **<u>श्री. रमेश वामन जाधव, राहणार-समशेरपुर, तालुका व जिल्हा- नंदुरबार, -</u>**<br>विस्तारिकरणामुळे घन कचरा वाढेल. तरी त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येणार? | **पर्यावरण सल्लागार –**<br>सर्व घनकचरा जसे कि यीस्टस्लज, ईटीपी व सीपीयू स्लज हा इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येणार असून जी राख तयार होईल, त्या राखेच्या वीटा तयार करणार आहोत. |
| १९ | **<u>श्री. गिरिधर शंकर पाटील, उपसरपंच, शिंदा –</u>**<br>येथे पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट आहे. त्यामुळे येथे ऊस शेतीचा प्रश्न येतो. आपण विस्तारिकरण करणार आहात व त्यासाठी ५० कि.मी. वरुन ऊस आणणार आहात. तर मी मा. जिल्हाधिकारी यांना विनंती करतो की येथे दोन ऊपसा सिंचनाचे काम चालू आहे. आर्थिक अडचणींमुळे काम अत्यंत धीम्या गतीने चालते. त्याचा पाठपुरावा करावा व हातभार लावावा व पंचक्रोशीतील गावांचा प्रश्न सोडविण्यात यावा. या उपसासिंचन योजनेचा सर्वांनाच फायदा होईल. या बाबत प्रकल्प प्रवर्तकांनी ग्रामपंचायतीस लेखी हमी देण्याबाबत सुचना करावी. | **पर्यावरण सल्लागार –**<br>यांनी बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे एक समिती स्थापन करण्याची माहिती दिली.<br>**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>प्रदूषणाची पातळी बघायची असेल तर डिस्प्ले बोर्ड लावण्यात यावे. पर्यावरण सल्लागार यांनी ते लावण्याचे कबूल केले. |
| २० | **<u>श्री. नरोत्तम पटेल, समशेरपुर, तालुका व जिल्हा- नंदुरबार, -</u>**<br>आता आमच्या शंकांचे निरसन झाले. तसेच ते भविष्यात व्हावे. | **पर्यावरण सल्लागार –**<br>याबाबतची पुष्टी मुद्या क्र. ३ व मुद्या क्र. १३ मध्ये करण्यात आलेली आहे. |
| २१ | **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. | -- |
| २२ | **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांमध्ये महिलाही होत्या. त्यांनाही सूचना नोदविण्याचे आवाहन करण्यात आले. | -- |

| | | |
|---|---|---|
| २३ | **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>**अ.** कारखाना चालवायचा असल्यास ईशान्य बाजूच्या शेतक-यांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. येथे सामंजस्य दिसत नाही. त्यांना विश्वासात घ्या.<br>**ब.** सादरीकरणात सांगितले की Used Oil will be burnt in boiler. तसे नाही. मप्रनि मंडळाने पारित केलेल्या संमतीपत्रानुसार Used Oil हे CHWTSDF ला देणे बंधनकारक आहे.<br>**क.** संमती पत्रातील अटी व शर्ती पाळणे बंधनकारक आहे. नसल्यास त्यामध्ये मप्रनि मंडळाकडून संमतीपत्रात आपण सुधारणा करुन घेऊ शकता. मप्रनि मंडळाने पारित केलेले नियम पाळणे बंधनकारक आहे.<br>**ड.** संमती पत्रातील अटी व शर्ती न पाळल्यास कारखान्याकडून घेतलेली बँक हमी ही जप्त करण्यात येते. | **पर्यावरण सल्लागार –**<br>आम्ही नियमांचे तंतोतंत पालन करू. |
| २४ | **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती -**<br>यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. त्यांनी बैठकीत केलेल्या चर्चांचा उहापोह करताना सांगितले की कुठलाही उद्योग आला, तर स्थानिकांची अपेक्षा असते की यात आपला फायदा झाला पाहिजे. सीएसआर निधी जनतेची गरज लक्षात घेऊन सीएसआर निधी विनियोगाची सांगड घालण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रकल्पात एक Grievance Redressal System कार्यरत असावी.<br>**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती**<br>समन्वयक यांना उपस्थितांना काही प्रश्न विचारण्याचे आवाहन करण्यास सांगितले व नसल्यास पुढील कार्यवाही करण्याची सूचना केली.<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी कोणाची सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. | -- |
| २५ | **श्री. विठ्ठल पाटील, राहणार – शिंदे गाव, तालुका व जिल्हा-नंदुरबार,**<br>प्रकल्पास पाठिंबा आहे. पण प्रकल्प चालविताना स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच वाहने चालतात, ट्रॅक्टर वगैरे ते माईक लाऊन मोठ्याने गाणे म्हणतात. | **प्रकल्प प्रवर्तक –**<br>यांनी सांगितले की १००% स्थानिकांना नोकरी देण्याचा आपला मानस आहे.<br>**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती-** |

| | | |
|---|---|---|
| | | यांनी प्रकल्प प्रवर्तकांना याबाबत त्वरित लक्ष देण्याची सूचना केली व जिल्हा प्रशासन म्हणून स्थानिक पोलिसांना याबाबत सूचना करण्याची ग्वाही दिली. |
| २६ | **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>यांनी उहापोह करताना सांगितले की स्थानिकांनी खूपच चांगले प्रश्न मांडले, ईशान्य दिशेकडील शेतक-यांचे प्रश्न मांडण्यात आले. तरी ज्या सूचना करण्यात आल्या, त्याचे प्रकल्प प्रवर्तकांनी तंतोतंत पालन करावे. कोणाला सूचना असेल तर ती उपस्थित करु शकता वा लेखी देऊ शकता. | -- |
| २७ | **श्री. विलास पाटील, बामडोद –**<br>हा प्रकल्प ऊभा राहतो, ते गौरवास्पद आहे. ज्या सूचना केल्या त्याचे पालन व्हावे व लिफ्ट इरिगेशनचा प्रश्न कायमचा संपुष्टात यावा. त्यासाठी स्थानिकांचे कायमचे सहकार्य राहिल.<br>काही स्थानिकांनी अध्यक्षाना सिंचनाबाबत माहिती सांगितली. त्याबाबत पाटबंधारे विभागाने पाहणी केल्याचे सांगितले. | **प्रकल्प प्रवर्तक –**<br>त्याबाबत पाटबंधारे विभागाने पाहणी केल्याचे सांगितले. |
| २८ | **समन्वयक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>एक लेखी तक्रार प्राप्त झालेली आहे. समन्वयक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी तक्रारीत सर्व मुद्दे वाचून दाखविले. त्यात राख, ध्वनि, दुषित पाणी, हवा प्रदूषण, मागील हंगामात केलेल्या तक्रारी याबाबत आक्षेप नोंदविल्याचे सांगितले. समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी पर्यावरण सल्लागार यांच्यातर्फे बैठकीत संपुर्ण निवेदन दिलेले आहे असे सांगितले. तरीही तक्रारीच्या अनुषंगाने निवेदन देण्याची सूचना करण्यात आली. | **पर्यावरण सल्लागार –**<br>आम्ही सर्व मुद्दयांचा आढावा घेतला आहे. त्यांनी सागितले की याबाबत Grievance Redressal Cell स्थापन करण्यात येईल, त्याबाबत सविस्तर माहिती अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात देण्यात येईल.<br>**समन्वयक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>सदरहू तक्रार बैठकीचे इतिवृत व अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत शासनास सादर करण्यात येईल. |
| २९ | **श्री. बन्सी भुला चौधरी, समशेरपूर –**<br>गळीत हंगाम कधी सूरू करण्यात येणार आहे याबाबत विचारणा केली व शेतक-यांना जास्तीतजास्त भाव देण्याची विनंती केली. | **प्रल्कल्प प्रवर्तक –**<br>आपला गळीत हंगाम हा २५-३० नोव्हेंबरला सूरू होईल. दरवर्षी देतो त्यापेक्षा जास्तही भाव देण्यास आम्ही कटीबध्द आहोत. |
| ३० | **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती –**<br>यांनी परत शेवटी कोणाला काही आक्षेप, सूचना असल्या त्या मांडण्याच आवाहन केले. | -- |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पुढिल कार्यवाही करण्याबाबत सांगितले.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहिर केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले. सदरहू बैठकीस ८२ व्यक्ती उपस्थित होत्या. बैठकीत १ निवेदन प्राप्त झाले व १ निवेदन बैठकीपुर्वी उप-प्रादेशिक कार्यालय, धुळे येथे प्राप्त झाले.

| सौ. सौजन्या सु. पाटील | श्री. प्रविण म. जोशी | श्री. महेश पाटील |
|---|---|---|
| संमन्वयक, जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे | सदस्य, जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि.मंडळ, नाशिक | अध्यक्ष, जनसुनावणी समिती तथा प्राधिकृत अप्पर जिल्हाधिकारी, नंदुरबार |